# भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate)

## (महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ प्रमाणे)

जा.क्र.

दिनांक 6/02/2018

मौजे कदमवाकवस्ती, ता.हवेली, ग.नं.३९५, मधील एकूण क्षेत्र ५२६.०० चौ.मी. या जागेमधील मंजूर रेखांकनातील निवासी व वाणिज्य इमारतीच्या बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) मंजूर करणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पुणे यांनी सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे कार्यालयाचा अहवाल अपेक्षिलेला आहे.

उक्त बांधकामास सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे कार्यालयाचे पत्र क्र.रेखांकन/एनएबीपी/मौ.कदमवाकवस्ती/ता.हवेली/ग.नं.३९५/ ससंपु/३६३९, दि.२१/०७/२०१२ अन्वये निवासी वापराच्या बांधकाम नकाशांना मंजूरीसाठी शिफारस करण्यात आलेली असून, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. एनए/एसआर/II/३०९/२०१२, दि.१८/०३/२०१३ अन्वये बांधकाम आराखडयास मंजूरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार उक्त प्रस्तावामध्ये रहिवास या इमारतीस परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर या इमारतीचे झालेल्या बांधकामाची समक्ष पाहणी केली आहे. प्रकरणी मंजूर बांधकाम नकाशा व अर्जदार यांनी दि.१५/११/२०१७ रोजी सादर केलेल्या रेकॉर्ड नकाशानुसार जागेवरील बांधकाम नियमाकुल करणे योग्य आहे.

या जागेतील इमारतींना जोते तपासणी प्रमाणपत्र देण्यात आलेल्या इमारतीचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | इमारत | मंजूर नकाशाचा तपशील | जागेवरील बांधकामाचा तपशील | जोते तपासणी प्रमाणपत्राचा दि- / पत्र क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | रहिवास व वाणिज्य | तळ / वाहनतळ + ३ मजले | तळ / वाहनतळ + ३ मजले | जोते तपासणी दाखला घेतलेला नाही. |

आता अर्जदारांनी या इमारतीस बांधकाम भोगवटा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

अर्जदार यांनी बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेल्या इमारतीचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | इमारत | मंजूर नकाशाचा तपशील | जागेवरील बांधकामाचा तपशील | मजला | सदनिका क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १) | रहिवास व वाणिज्य | तळ / वाहनतळ + ३ मजले | तळ / वाहनतळ + ३ मजले | तळ / वानहतळ | दुकान १ ते ३ व वाहनतळ |
| | | | | पहिला | १०१ ते १०४ |
| | | | | दुसरा | २०१ ते २०४ |
| | | | | तिसरा | ३०१ ते ३०४ |
| | | | | एकूण | ३ दुकान व १२ सदनिका |

ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING & VALUATION PUNE BRANCH

**मंजुरीच्या अटींतील कागदपत्राची पुर्तता अर्जदार यांनी खालील प्रमाणे केली आहे.**

| | | |
|---|---|---|
| १) | बांधकाम परवानगी प्रत. | छायाप्रत जोडली आहे. (मंजूर नकाशा रेकॉर्ड प्लॅनसह) |
| २) | Architect | वास्तुविशारद श्री.अतित अदमुलवार यांचे दि.१८/०८/२०१७ चे प्रमाणपत्र |
| ३) | Structural Engineers Stability Certificate | श्री.आर. के. रंधवे, यांचे दि.२०/०७/२०१७ रोजीचे प्रमाणपत्र. |
| ४) | Site Engineer | श्री.सचिन राठी यांचे पत्र क्र.१८/०८/२०१७ |
| ५) | मोजणी नकाशा | दि.२०/०२/२०१७, मो.र.नं.२१६६ |
| ६) | ७/१२ उतारा | सोबत जोडला आहे. |
| ७) | Solar System | एकलायश वाटरटेक प्रा.लि. यांचे प्रमाणपत्र. |
| ८) | Rain Water Harvesting | मानसी एंटरप्रायझेस यांचे प्रमाणपत्र. |

| | | |
|---|---|---|
| ९) | जोते तपासणी दाखला | जोते तपासणी दाखला घेतलेला नाही. |
| १०) | LIFT N.O.C | प्रस्तावित नाही. |
| ११) | पाणी पुरवठा तरतूद | हमीपत्र क्र.१९२/२०१७, दि.०२/०८/२०१७ सादर केले आहे. |
| १२) | Drainage | श्री.अनिल मनोहर कांबळे यांचे पत्र. |

प्रस्तावासोबत मंजूर रेखांकन/बांधकाम नकाशानुसार केलेल्या सिमांकनाचा प्रमाणित नकाशा अर्जदारांनी सादर केला असून मंजूर नकाशानुसार तपासणी केलेली आहे. याबाबत अर्जदार यांनी भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिलेले वरील नमूद रेकॉर्ड नकाशानुसार केले असल्याने बांधकामाचे स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्रही अर्जदार यांनी सादर केलेले असल्याने त्यास खालील अटीस अधिन राहून भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

१) अर्जदार यांना उक्त इमारतीमधील सावजनिक जागा उदा.सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचा एरिया सर्व लोकांसाठी खुला ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र.७.१ नुसार, संबंधित प्राधिकारी यांनी बांधकाम नकाशे मंजूर केले असल्यास अथवा नसल्यास अथवा त्यांनी जागेवर बांधकामाची पाहणी केली असल्यास किंवा नसल्यास, यापैकी काहीही असले तरी, विकास नियंत्रण नियमावलीनुसार आणि भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिन मालक यांची असून श्री.सुभाष काशिनाथ काळभोर व इतर, यांनी दि.०९/०८/२०१७ रोजी रु.५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र क्र.१९७/१७ सादर केलेले आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र विकासकावर बंधनकारक राहील.

३) सादर केलेली कागदपत्रे व माहिती चूकीची अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास, दिलेले भोगवटा प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

सोबत : रेकॉर्ड नकाशे

(विजय बा. शेंडे)
सहायक संचालक, नगर रचना,
पुणे शाखा, पुणे

उपमुख्य कार्यकारी अधिकारी पु
(पंचायत) पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत:-

१) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांना माहितीसाठी सादर.
२) अर्जदार श्री.सुभाष काशिनाथ काळभोर, ता.हवेली, जि.पुणे
३) ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कदमवाकवस्ती, ता.हवेली, जि.पुणे

वाचा -1. महाराष्ट्र शासनाचेराजपत्र दि.29 डिसेंबर 2014

2.शासन निर्णय शासन निर्णय क्र. व्हीपीएम2015/ प्र.क्र.39/ पं.रा.4 दि. 11 डिसेंबर 2015

3.सहाय्यक संचालक,नगररचना,पुणे यांचे कडील पत्र जा.क्र. मौ.कदमवाकवस्ती/ता.हवेली/ग.नं.395/भो.प्र./ससंपु /19 दि.01/01/2018

---

## आदेश

पुणेजिल्हापरिषद,पुणे
स्व.यशवंतराव चव्हाण भवन
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग ,कॅम्पपुणे
जा.क्र.जिप/पंचा/ 5-7/ 48 /2018
पुणेदिनांक 16/02/2018

विषय:- ग्रामपंचायत कदमवाकवस्ती येथील गट नं. 395 मधील क्षेत्र 526.00 चौ.मी या जागेमधील मंजूर रेखांकनाती रहिवास व वाणिज्य + निवासी इमारतीच्या बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र (पुर्णत्वाचे प्रमाणपत्र) देणेबाबत

उपरोक्त बांधकामास सहायक संचालक , नगर रचना , पुणे यांचेकडील पत्र क्र.रेखांकन/एनएबीपी/मौ.कदमवाकवस् हवेली / ग.नं.395 / ससंपु/3639 दि.21/07/2012 अन्वये निवासी व वाणिज्य वापराच्या बांधकाम आराखडयास मंजूरी दे आलेली आहे.

त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर या इमारतीचे झालेल्या बांधकामाची समक्ष तपासणी केलेली असता मंजूर बांधक नकाशाप्रमाणे बांधकाम केलेचे दिसून येत असलेचे प्रमाणित करुन बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सांक्षाकित करुन सहा संचालक , नगर रचना पुणे शाखा यांनी पत्र पत्र जा. मौ.कदमवाकवस्ती/ता.हवेली/ग.नं.395/भो.प्र./ससंपु /19 दि.01/01/2018 अन्वये प्रमाणित करुन दिलेले आहे.

तरी याप्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

उप मुख्यकार्यकारीअधिकारी (पंचायत)
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रति,

सरपंच /ग्रा.वि.अ./ग्रामपंचायत कदमवाकवस्ती,ता. हवेली.जि.पुणे.

2/- मंजुर आराखडा नुसार आपले स्तरावरुन ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 52,53 व 176 अन्वये बांधकामाचे नोंदीबाबत नियमनुसार आवश्यक कार्यवाही करणेत यावी.

प्रत—माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

1) गट विकास अधिकारी, पंचायत समिती , हवेली, जि.पुणे.

2) श्री.सुभाष काशिनाथ काळभोर रा. कदमवाकवस्ती ता. हवेली

उप मुख्यकार्यकारीअधिकारी (पंचायत)
पुणे जिल्हा परिषद पुणे